# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६ व २७५७८४०९
ई-मेल : ms@mjp.gov.in/ cao@mjp.gov.in


जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.१५/बैठक-१५६/आ-४, दिनांक :-२६/०८/२०२४

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा संचालक मंडळाचे पदसिध्द सहअध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा संचालक मंडळाचे पदसिध्द सहअध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग तथा संचालक मंडळाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५६व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५६व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपली विश्वासू,

२६/८/२४

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बेलापूर मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५६व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५६वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली ७वा मजला, मुख्य इमारत, परिषद सभागृह क्र.५, मंत्रालय, मुंबई येथे मंगळवार दिनांक २३ जुलै, २०२४ सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा संचालक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष.
२) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा संचालक मंडळाचे सदस्य
३) श्री.एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई तथा संचालक मंडळाचे सदस्य
४) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा संचालक मंडळाचे सदस्य सचिव

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
२) श्री.राजश्री ठोकळ, संचालक (वित्त) प्रभारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
३) श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.
४) श्री.प्रशांत भामरे, मुख्य अभियंता प्रभारी, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५५व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५५वी बैठक दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५५व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५५व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न झालेल्या १५५व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५५व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२३-२४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

**१.१** राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा आणि मलनि:सारण कार्यक्रमांचा जलद गतीने विकास व नियमन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र अधिनियम क्र.XLVIII, १९७६ अन्वये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची स्थापना नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित करण्यात आली. तद्नंतर दि.०१.११.१९७९ रोजी नगर विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या परिसर अभियांत्रिकी विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी (वर्ग-१ ते ४), मत्ता व दायित्वासह हस्तांतरण या मंडळाकडे करण्यात आले. नागरी व ग्रामीण क्षेत्रात पिण्याचे शुध्द पाणी देण्याच्या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी बृहत आराखडयाच्या पार्श्वभूमीवर मार्च १९९७ मध्ये वरील अधिनियमात दुरुस्ती करुन सदरहू मंडळाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) असे नामकरण करण्यात आले.

**१.२** राज्यातील पाणी पुरवठा आणि मलनि:सारण योजनांचे संकल्पन, अंमलबजावणी आणि आवश्यकतेनुसार काही योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येते. राज्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही पाणी पुरवठा व मलनि:सारण क्षेत्रातील तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य असलेली महत्वाची व एकमेव राज्यस्तरीय यंत्रणा आहे.

**१.३** नगरविकास विभाग व ग्रामविकास विभाग यांची विभागणी करुन पाणी पुरवठा व स्वच्छता या स्वतंत्र विभागाची स्थापना ९ नोव्हेंबर १९९५ रोजी करण्यात आली. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने शासनाने सन २००० पासून पाणी पुरवठा क्षेत्रासाठी "मागणी आधारित" योजनांच्या अंमलबजावणीचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यानुषंगाने या क्षेत्रातील योजनांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरली. सद्य:स्थितीत "मागणी आधारित सामुदायिक सहभागाच्या तत्वावर" पाणी पुरवठा व मलनि:सारण योजना राबविण्याचे धोरण सध्या राबविले जात आहे.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम २३ व २३ (अ) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सेवेतील सर्व अधिकारी/कर्मचारी त्याचप्रमाणे अतांत्रिक संवर्गातील जे कर्मचारी प्राधिकरणाच्या सेवेमध्ये कायमस्वरुपी समाविष्ट झाले, अशा सर्व कर्मचाऱ्यांना शासनाचे सर्व सेवा नियम व इतर सर्व सवलती जशाच्या तशा लागू राहतात, ही तरतूद विचारात घेऊन शासनाच्या नगर विकास विभागाचे पत्र क्र.एसीटी-१३८२/४८/सीआर-२४१/युडी.१५ दि.२१.०१.१९८४ अन्वये शासनाचे सर्व सेवा नियम व इतर फायदे प्राधिकरणातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू केलेले आहेत.

भाग - १

३. दि. १ नोव्हेंबर, १९७९ रोजी नगरविकास व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागातून (UDPHED) परिसर अभियांत्रिकी हा भाग विलग करुन त्या सेवांसाठी स्वतंत्र बोर्ड करण्यात आले (MWSSB). परंतू या MWSSB वर नगरविकास विभागाचे प्रशासकीय नियंत्रण होते व नगरविकास विभागाचीच तांत्रिक शाखा म्हणूनच

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

MWSSB कार्यरत होते. दि.९ नोव्हेंबर, १९९५ रोजी स्वतंत्र पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग स्थापन करण्यात येऊन MWSSB या नवीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली देण्यात आले.

४. अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ग्राहकांकरिता पाणीपट्टीच्या मुळ मुद्दलावरील विलंब आकार माफीच्या सवलतीची अभय योजना जाहीर करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे एकुण ५१ पाणी पुरवठा योजना असून या योजनेच्या ग्राहकाकडे दिनांक ३१/०३/२०२२ अखेर पाणीपट्टीची एकुण मुद्दल रु.५९८.४६ कोटी व विलंब आकार रु.५०७.६३ कोटी अशी एकुण रु.११०६.०९ कोटी थकबाकी असून याबद्दल साततयाने प्रयत्न करुनही हया थकबाकीच्या स्थितीत सुधारणा न झाल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४८ व्या बैठकीत वसुलीसाठी प्रोत्साहनात्मक अशी अभय योजना प्रस्तावित करण्यात आली. त्यानुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.१२/०१/२०२२ च्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ग्राहकांना प्रोत्साहन मिळणेकरिता विलंब आकार सवलतीची अभय योजना लागू करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

शासनाने वरील पत्राद्वारे मंजुर केल्यानुसार खालीलप्रमाणे पाणी पट्टीची थकबाकी व त्यावरील विलंब आकार यासाठी अभय योजना म.जी.प्रा.चे परिपत्रक क्र.मजीप्रा /वित्त-१/वसुली/अभय योजना/२०२२/ दि.१७/०१/२०२२ नुसार परिपत्रकाच्या निर्गमन दिनांकापासून जाहिर करण्यात आली होती.

परिपत्रक क्र.मजीप्रा/वित्त-१/वसुली/अभययोजना/२०२२/४२ दि.१.११.२०२२ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.१८.१०.२०२२ च्या १५३ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.८ अन्वये पारीत केलेल्या ठरावानुसार योजनेच्या पुढील संपुर्ण कालावधीकरिता मार्च २०२३ पर्यंत मुद्दलाची पुर्ण रक्कम भरल्यास विलंब आकारात १००% माफीची सवलत देण्यास मान्यता देण्यात आली. योजनेत सहभागी होण्याकरिता अर्ज सादर करावयाची मुदत संपूर्ण योजना कालावधीसाठी वाढवून देण्यात आली होती.

अभय योजना राबविण्याचा कालावधी १ फेब्रुवारी २०२२ ते ३१ मार्च २०२३ करण्यात आला आहे. तसेच अभययोजना दि.३१.३.२०२२ अखेर प्रलंबित असलेल्या थकबाकी वरील विलंब आकार माफीसाठी लागु करण्यात आली होती.

अभय योजनेच्या दि.१ फेब्रुवारी २०२२ ते दि.३१ मार्च २०२३ या कालावधीत पाणीपट्टीची थकबाकीची मुद्दल रु.८२८८.२९ लाखाची वसुली अभय योजनेत भाग घेतलेल्या थकबाकीदारांकडुन करण्यात आली होती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दि. २५.४.२०२३ च्या १५४व्या बैठकीत बाब क्र. १० अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार अभय योजनेस मुद्यलाची पुर्ण रक्कम भरल्यास विलंब आकारात १००% माफीची सवलत देण्यास एप्रिल २०२३ ते संप्टेबर २०२३ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे पत्र क्र.अभय-२०२१/प्र.क्र.२७/पापु-०४ दि. २५/०९/२०२३ अन्वये अभय योजनेस माहे एप्रिल २३ ते माहे ऑक्टोबर २०२३ पर्यत मुदतवाढ देण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ग्राहकांकरिता कार्यालयाचे परिपत्रक क्र. मजीप्रा/ वित्त-१/ वसुली/अभय योजना/२०२३/११७ दि.२६/०९/२०२३ माहे एप्रिल २३ ते माहे ऑक्टोबर २०२३ पर्यंत अभय योजनेस मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

३१ ऑक्टोबर २०२३ पर्यंत या कालावधीत पाणीपट्टीची थकबाकीची मुद्दल रु.४९४.२१ लाखाची वसुली अभय योजनेत भाग घेतलेल्या थकबाकीदारांकडुन करण्यात आली.

४. **ब)** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २५.०४.२०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजना म्हणून होणाऱ्या पाणी पुरवठयाचा दर १०% सुधारीत करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक ०१/०७/२०२३ पासून सुधारीत पुरवठयाचा दर लागू करण्याची सुधारीत दराची अधिसूचना शासनाचे राजपत्र जाक्र.म.जी.प्रा./वित्त-२/परिव्यय/निधी/१४७ दिनांक १५/०६/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तथापि सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई कार्यालयाचे दि. १५/०६/२०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सुधारित करण्यात आलेल्या अंबरनाथ पाणी पुरवठा योजना पाणी पट्टीच्या दरामध्ये करण्यात आलेली १० टक्के वाढ किरकोळ ग्राहकांच्या पाणी पट्टीसाठी रद्द करण्यात आली आहे. तसेच मा. मंत्री महोदय. (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या प्रसिध्द केलेले जा.क्र.मजीप्रा/वित्त-२/निधी/३१५ दि. ०१.१२.२०२३ रोजीच्या शुध्दीपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक ०९.०१.२०२४ रोजी झालेल्या १५५व्या बैठकीत आयत्यावेळेच्या विषयामध्ये बाब क्र. १ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

४. **क)** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचालक मंडळाच्या दिनांक ०९.०१.२०२४ रोजी झालेल्या १५५ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र. ५ नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १९८९ च्या उपविधीतील कलम ५,६,७,११ आणि १२ (अ) अंतर्गत प्राधिकरणाच्या (१)जलमापकाचे सध्याचे मासिक भाडे (२) नळ जोडणीचे शुल्क (३) नळ जोडणी खंडीत करणे/पुनर्जोडणी यासाठी सेवा शुल्क (४) जलमापक चाचणीचे सेवा शुल्क (५) जलमापक काढणे व बसविणे (६) पाणी देयकासाठी जलमापकाचे सुरक्षा अनामत रक्कम (७) जलमापकाचे सील जोडणे/ जलमापकाचे सील तोडणे/जलमापकास हानी पोहचविणे यासाठी दंडात्मक कारवाई इत्यादीसाठी आकारण्यात येणारे भाडे/शुल्क यात सन २०१६ पासुन वाढ करणेत आलेली नव्हती सदर दरवाढ २५% ते ३० % करण्यास संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळालेली आहे.

४. ड) संचालक मंडळ बैठक क्र. १५४ कार्यक्रम बाब क्र. ८ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाच्या नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा ४७ योजना कार्यान्वित होत्या त्यापैकी तिरोरा, पातूर, अकोट ८४ गावे या ३ योजना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पुर्वीच्या योजनापैकी ४४ व औरंगाबाद विभागातील जालना मधील ग्रामीण पेयजल योजना बंद झाल्याने संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीतील अनुक्रमे बाब क्र. ११ व १७ नुसार १७६ गावे व ९५ गावे ग्रीड पा.पु.योजना ता. पातुर मंठा, जालना, जि. जालना या दोन योजना एक वर्षासाठी देखभाल दुरुस्ती च्या खर्चासाठी मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्यांचा समावेश या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आला असुन एकुण ४६ योजना आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**५. म.जी.प्रा.ची आर्थिक स्थिती :**

सद्य:स्थितीचा विचार करता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सन २०२३-२४ या वर्षातील आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे राहिल. (सुधारीत अंदाजपत्रक )

| उत्पन्न | | खर्च | |
|---|---|---|---|
| तपशील | रु . कोटी | तपशील | रु . कोटी |
| ईटीपी/तांत्रिक सेवा शुल्क/ पीएमसी | १२२.२७ | प्रशासकीय खर्च | १०१.११ |
| तात्पुरत्या गुंतवणूकीवरील व्याज | २४.३८ | शासनास करावयाची जमा | १०७.६८ |
| पाणी विक्री<br>नागरी रु. २३२.०० कोटी<br>ग्रामीण रु. ६८.०० कोटी | ३००.०० | देखभाल दुरुस्ती<br>नागरी रु. २१०.१६ कोटी<br>ग्रामीण रु. ८२.३६ कोटी | २९२.५२ |
| शासनाकडून प्राप्त अनुदान<br>१)वेतन व भत्ते रु.३१४.२२ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.७३७.८५ कोटी | १०५२.०७ | १)वेतन व भत्ते रु.३०३.६१ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.५२१.०९ कोटी | ८२४.७० |
| इतर | १९.९९ | | |
| एकुण | १५१८.७१ | एकुण | १३२६.०१ |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२४-२५ करिता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे राहिल.

| उत्पन्न | | खर्च | |
|---|---|---|---|
| तपशील | रु . कोटी | तपशील | रु . कोटी |
| ई टी पी /तांत्रिक सेवा शुल्क/ पीएमसी | १३५.९५ | प्रशासकीय खर्च | १२०.१४ |
| तात्पुरत्या गुंतवणूकीवरील व्याज | २६.८२ | शासनास करावयाची जमा | ११८.४५ |
| पाणी विक्री<br>नागरी रु.२५६.०० कोटी<br>ग्रामीण रु.७४.०० कोटी | ३३०.०० | देखभाल दुरुस्ती<br>नागरी रु.२३१.६१ कोटी<br>ग्रामीण रु.८८.९८ कोटी | ३२०.५९ |
| शासनाकडून अपेक्षित अनुदान<br>१)वेतन व भत्ते रु.३८७.३७ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.७७९.९२ कोटी | ११६७.२९ | १)वेतन व भत्ते रु.३७६.७६ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.५६३.१६ कोटी | ९३९.९२ |
| इतर | २२.४५ | | |
| एकूण | १६८२.५१ | एकुण | १४९९.११ |

६. शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र. मजीप्रा-२०१४/ प्र.क्र. ३३(अ)/पापु-२३, दि. २३ मार्च, २०१७ मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्याचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्ती वेतनाचे दायित्व राज्य शासनामार्फत खालील प्रमाणे स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त होण्यापूर्वी जे अधिकारी/कर्मचारी शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून नियुक्त झाले होते, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण स्वायत्त संस्था स्थापन झाल्यानंतर प्राधिकरणामध्ये जे अधिकारी/कर्मचारी नियुक्त झालेले आहेत, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविण्यात येईल.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यासाठी प्राधिकरणाला शासनाकडून अनुदानापोटी निधी वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी वितरीत करतांना पुढील अटींच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येतो.

अटी :-

अ) शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या वेतन/भत्यासाठी वापरण्यात यावा. वेतन/भत्त्यांच्या यापूर्वीच्या कोणत्याही थकबाकीसाठी या निधीचा वापर करु नये. या निधीचा अन्य बाबीवरील खर्च (विनियोग) ही वित्तीय अनियमितता समजण्यात येईल. व अशा कृतीसाठी संबंधीत अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

ब) दि.२३.३.२०१७ पूर्वीच्या वेतन/भत्त्या संदर्भातील कोणत्याही थकीत रकमांचे दायित्व शासनाने स्विकारले नसल्यामुळे या दिनांकापूर्वीच्या वेतन/भत्त्यासंदर्भातील कोणत्याही थकबाकीसाठी या निधीचा वापर करु नये.

निवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ मधून तरतुद करण्यात येत आहे.

**७.** (१) शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार व शासन अटीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्क शासनास सन २०२३-२४ मध्ये खालील प्रमाणे भरणा केलेला आहे.

(रु. लक्ष)

| अ.क्र. | महिना | ईटीपी | तांत्रिक शुल्क | एकुण | चलन क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सन २०२३-२४ | | | | | | |
| १ | एप्रिल २०२३ | २०४.०० | ७७९.०० | ९८३.०० | T.N.००४५२१ | ०६.०६.२०२३ |
| २ | मे २०२३ | २०३.०० | १०६३.०० | १२६६.०० | T.N.००४५२१ | ०६.०६.२०२३ |
| ३ | जून २०२३ | ११७.०० | ८९५.०० | १०१२.०० | T.N.००७३२५ | १३.०७.२०२३ |
| ४ | जुलै २०२३ | २७.०० | ५५३.०० | ५८०.०० | T.N.००९५०३ | १४.०८.२०२३ |
| ५ | ऑगस्ट २३ | २३१.०० | ६१७.०० | ८४८.०० | T.N.००१६७९ | १५०९.२०२३ |
| ६ | सप्टेंबर २३ | ९५.०० | ६००.०० | ६९५.०० | T.N.००३९६८ | २५.१०.२०२३ |
| ७ | ऑक्टोबर २३ | ३३.०० | ५९२.०० | ६२५.०० | T.N.००५०२२ | ०७.११.२०२३ |
| ८ | नोव्हेंबर २३ | ४१.०० | ६१४.०० | ६५५.०० | RBI कडे जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. | |
| | एकुण | ९५१.०० | ५७१३.०० | ६६६४.०० | एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दि. ०१.०४.२०१७ पासून सुधारित वेतन श्रेणीनुसार ७ वा वेतन आयोग लागू केला आहे.

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-१११९/ प्र क्र.६५/ पापु-२३ दि.२३.०९.२०२१ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन/भत्यांचे दायित्व शासनाने दिनांक २३ मार्च, २०१७ पासुन स्विकारले असल्यामुळे, एप्रिल,२०१७ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचना मंजुर करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-१११९/ प्र क्र.०६५/ पापु-२३ दि.२३.०९.२०२१ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन/कुंटुंब निवृत्तीवेतन देण्यात आले. तथापी त्याची थकबाकी खालीलप्रमाणे आहे.

शासनाने ७ वा वेतन आयोग लागु केल्यामुळे वेतनाच्या थकबाकीसाठी खालील प्रमाणे शासनाचे दायित्व राहणार आहे.

(रु.कोटी)

| कालावधी | नियिमित आस्थापना | सेवा निवृत्त अधिकारी/ कर्मचारी | एकूण (४+५) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१/०४/२०१७ ते ३०/०९/२०२१ (५४ महिने) वेतन/निवृत्ती व भत्ते | २१.२१ कोटी चे देय ४ हप्ते मिळून रु.८४.८३ कोटी. | २ हप्ते प्राप्त असून ३ रा व ४ था हप्ता शासनाकडून रु.५३.४४ कोटी येणे बाकी. | १३८.२७ |
| ०१/०४/२०१७ ते ३०/०९/२०२१ (५४ महिने) अर्जित रजा रोखीकरण | ८.२९ | ० | ८.२९ |
| एकूण | ९३.१२ | ५३.४४ | १४६.५६ |

शासनास यापूर्वीच उपरोक्त निधीची मागणी करण्यात आली आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.मजीप्रा-११२२/प्र.क्र.३४/पापु-२३ दि.०१.०२.२०२३ व दि.२८.०३.२०२३ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे देय निवृत्तीवेतनाच्या थकबाकीचे २ हप्ते व निवृत्ती उपदान/मृत्यूउपदान अंशराशीकरणाच्या फरकाचा निधी रक्कम रु.२५५.४० कोटी मंजूर करण्यात आले आहेत. तथापी अद्याप कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी ७ वा वेतन आयोगाप्रमाणे देय फरकाची रक्कम मंजूर करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दायित्व

अ) नियमित आस्थापना (रु.कोटी)

| कालावधी | नियिमित आस्थापना | सेवा निवृत्त अधिकारी/ कर्मचारी | एकूण (२+३) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ) नियमित आस्थापना | | | |
| ०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०१७ (१५ महिने) वेतन व भत्ते | १९.२० | ८.०८ | २७.२८ |
| ०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०१७ (१५ महिने) अर्जित रजा रोखीकरण | ०.०० | २.१० | २.१० |
| एकूण | १९.२० | १०.१८ | २९.३८ |
| ब) रुपांतरीत आस्थपना | | | |
| ०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०१७ (१५ महिने) वेतन व भत्ते | ५.०६ | २.५४ | ७.६० |
| ०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०१७ (१५ महिने) अर्जित रजा रोखीकरण | ०.०० | ०.६० | ०.६० |
| ०१/०४/२०१७ ते ३०/०९/२०२१ (५४ महिने) वेतन व भत्ते | १४.१५ | ६.३५ | २०.५० |
| ०१/०४/२०१७ ते ३०/०९/२०२१ (५४ महिने) अर्जित रजा रोखीकरण | ०.०० | १.५० | १.५० |
| एकुण | १९.२१ | १०.९९ | ३०.२० |
| एकूण अ + ब | ३८.४१ | २१.१७ | ५९.५८ |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना देखील राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे दि.०१.०१.२०१६ पासून ते ३१.०३.२०१७ या कालावधीसाठी ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत प्राधिकरणामार्फत विनंती करण्यात आली आहे. तथापि, अद्याप त्यास मान्यता मिळालेली नाही.

भाग – २

प्राधिकरणाचे अंदाजपत्रक :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम १५(२) (ग) अन्वये प्राधिकरणाला स्वत:चे अंदाजपत्रक बनविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. हे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील ३४(१) नुसार शासनाच्या पूर्व मंजूरीने अंमलात आणावयाचे आहे.

प्राधिकरणाचे अंदाजपत्रक दोन भागात विभागलेले आहे.

महसूली :- महसूल भागात महसूली जमा व महसूली खर्च,
भांडवली :- भागात भांडवली जमा व भांडवली खर्च यांचा समावेश आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

८. कार्यक्रमांचे विश्लेषण :

शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचा-यांचे वेतन व भत्ते निवृत्ती वेतनाचे दायित्व स्विकारले असल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार ई.टी.पी.चे उत्पन्न शासन खाती भरणा करण्यात येत आहे. सध्या प्रगतीपथावर असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. परिणामत: आता जागतिक बँक अर्थसहाय्याने होणा-या योजना इ. साठी त्याहूनही कमी आकारणी करुन कामे मिळविणे, या स्वरुपाचे उत्पन्न वाढविणे तसेच सल्ला सेवाव्दारे उत्पन्न मिळविणे असे पर्यायही स्वीकृत करुन कार्यवाहीत आहेत.

९. महसुली अंदाजपत्रक :

महसुली जमेपासून सन २०२३-२४ सुधारित व २०२४-२५ मध्ये मिळणारे उत्पन्न अनुक्रमे रु.१५१८.७१ कोटी व रु. १६८२.५१ कोटी आणि खर्च रु. १३२६.०१ कोटी व रु. १४९९.११ कोटी अपेक्षित आहे. त्याचा तपशिल विवरणपत्र १ व २ मध्ये दर्शविला आहे.

अ) महसूली जमा : विवरणपत्र १

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य महसुली जमेमध्ये ईटीपी आकारातून मिळणारे उत्पन्न, सल्ला सेवेतून मिळणारे उत्पन्न तसेच पाणी विक्री, मिटर भाडे, निविदा विक्री, संकीर्ण महसूल, सर्वेक्षण कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, आराखडा तयार करणे इत्यादी कामा करीता मिळणारे शुल्क आणि ठेवीवरील (अल्प कालावधीसाठी) व्याज, इत्यादींचा समावेश होतो.

ब) महसूली खर्च : विवरणपत्र २

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कार्यरत व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनसाठी राज्य शासनाकडुन अनुदान प्राप्त होतो. प्रवास, वैद्यकीय खर्च भरपाई, गणवेष व वर्दी, प्रशिक्षण, मुद्रण, जाहिरात व प्रसिद्धी, दूरध्वनी व तार, वीज पाणीपटटी, भाडेपट्टी व कर शासनास भरावयाची ई .टी. पी. आकार, तांत्रिक सेवा शुल्क तसेच पाणी पुरवठा केंद्राची देखभाल व दुरुस्ती इत्यादींचा समावेश आहे.वेतन व निवृत्ती वेतनासाठी शासनाकडुन अनुदान प्राप्त होते. त्या मधुन हा खर्च करण्यात येतो.

सन २०२३-२४ चे मूळ तसेच सुधारित अंदाज व २०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महसूली जमा व महसुली खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| महसुली जमा (रुपये लाखात) | | | महसुली खर्च (रुपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसकल्पीय अंदाज |
| २०२३-२४ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| १६६११० | १५१८७१ | १६८२५१ | १३८२५० | १३२६०१ | १४९९११ |

१०. भांडवली अंदाजपत्रक :

अ) भांडवली जमा : विवरणपत्र ३

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

भांडवली जमेत मुख्यत्वेकरुन महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडून विविध योजनांकरीता मंजूर वित्तीय आकृतीबंध आणि शासन धोरण या नुसार प्राप्त होणा-या योजनांतर्गत व योजनेतर अनुदानाचा समावेश असतो. महाराष्ट्र शासन नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना तसेच जलनि:सारण योजनांसाठी शासनाच्या अंदाजपत्रकात अनुदानाची तरतुद करते, हया तरतुदीनुसार प्राधिकरणाला वेळोवेळी योजना राबविण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते.

ब) भांडवली खर्च : विवरणपत्र ४

शासनाकडून मिळणारे योजनेवरील अनुदान व वित्तिय संस्थांकडून मिळणारे कर्ज इत्यादी द्वारे उपलब्ध निधी त्या त्या योजना राबविण्यासाठी वापरला जातो.

सन २०२३-२४ चे मूळ तसेच सुधारित व २०२४-२५ चे अंदाजपत्रकातील भांडवली जमा व भांडवली खर्चाचा संक्षिप्त गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

| भांडवली जमा (रुपये लाखात) | | | भांडवली खर्च (रुपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | अर्थसकल्पीय अंदाज |
| २०२३-२४ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२३-२४ | २०२२-२३ | २०२३-२४ |
| २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० | २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |

११. पाणी पुरवठा योजना :

अ) नागरी पाणी पुरवठा योजना :

नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी अमृत कार्यक्रम शासनाने विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे आकृतीबंधानुसार खर्च करणे आवश्यक असते. त्यामध्ये शासकीय अनुदान - केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा आणि नगरपालिकाकडून भरावयाची लोकवर्गणी यांचा समावेश असतो.

ब) ग्रामीण पाणी पुरवठा योजना :

ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राधिकरणास राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान, केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान याचा समावेश असतो. सद्यस्थितीत १००% अनुदान येत नसले तरी प्राधिकरणामार्फत या योजनाची अंमलबजावणी करणेत येते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खालील नागरी व ग्रामीण योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (जल जीवन मिशन)
२. तिल्लारी प्रकल्पाच्या आधारित पाणी पुरवठा योजना
३. ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाबार्ड कर्ज
४. मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम ( पुर्नरुज्जीवीत / सर्वसाधारण घटक राज्य हिस्सा)
५. मराठवाडा ग्रीड योजना

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

६. नागरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे टंचाई निवारणार्थ योजना

७. जलस्वराज्य टप्पा – २

८. अमृत पाणी पुरवठा योजना

९. नगरोत्थान पाणी पुरवठा योजना

१०. नागरी पाणी पुरवठा योजना

१२. भांडवली जमा व भांडवली खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी मुख्यत्वे महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीव्दारे अपेक्षित अनुदानाच्या अधीन राहून केल्या आहेत.

सन-२०२३-२४ ते २०२४-२०२५ या वर्षातील प्रत्यक्ष तसेच अंदाजित महसुली व भांडवली आयव्यय खालील प्रमाणे आहे.

(रुपये लक्ष)

| अ. क्र. | तपशिल | २०२२-२०२३ प्रत्यक्ष | २०२३-२०२४ मूळ अंदाज | २०२३-२४ सुधारित अंदाज | २०२४-२५ अर्थसंकल्पिय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | १३८८३२ | १६६११० | १५१८७१ | १६८२५१ |
| २ | महसुली खर्च | ११९७३३ | १३८२५० | १३२६०१ | १४९९११ |
| ३ | भांडवली जमा | २७९५७.९२ | २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |
| ४ | भांडवली खर्च | २७९५७.९२ | २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |

वरील प्रमाणे सन २०२३-२४ चे सुधारित अंदाज व सन-२०२४-२०२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज महसुली व भांडवली आयव्यय प्राधिकरणास मान्य असल्यास खालील प्रमाणे ठराव मान्य करावा ही विनंती.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन-२०२३-२४ चे सुधारित अंदाज व सन-२०२४-२५ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लक्ष)

| अ.क्र. | तपशिल | सन-२०२३-२४ चे सुधारित अंदाज | सन-२०२४-२५ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | १५१८७१ | १६८२५१ |
| २ | महसुली खर्च | १३२६०१ | १४९९११ |
| ३ | भांडवली जमा | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |
| ४ | भांडवली खर्च | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी ७ वा वेतन लागु केल्यामुळे वेतन व भत्ते थकबाकीसाठी सन २०२३-२४ मध्ये थकबाकीची रक्कम न मिळाल्याने सन २०२४-२५

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

साठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हप्त्याची रक्कम प्रत्येकी रु.२१.२१ प्रमाणे पाच हप्त्याची रक्कम रु. १०६.०४ कोटी व अर्जित रजा रोखीकरण थकबाकीसाठी एकरकमी रु ८.२९ कोटी निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०२४-२५ साठी लेखाशिर्ष क्र.२२१५A०४१ अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी रु. ३७६.७६ कोटीची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. त्यामध्ये प्रत्यक्ष वेतन व भत्त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी रु.२३१.५४ कोटी, वेतन व भत्त्याच्या थकबाकीची रक्कम रु.१०६.०४ व पदभरतीसाठी येणारा खर्च रु.३०.८९ कोटीचा समावेश आहे. तरी मागणी केलेले संपूर्ण अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात यावे.

४) सन २०२३-२०२४ साठी शासनाच्या व्हाईट बुक मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी साठी शासनाकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन, उपदान व अंशदानासाठी रु.३५७.६३ कोटी तरतूद मंजूर झालेले आहेत. प्रत्यक्ष रु. ३३६.४६ कोटी प्राप्त झाले असून प्रत्यक्ष खर्च रु. ४६२.६५ लक्ष होणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने खर्च केलेले सन २०१७-१८ ते २०२०-२१ व सन २०२१-२२ मधील एकूण रु.२१६.७६ कोटी अनुदान सन २०२३-२४ साठी उपलब्ध करुन देण्यात यावे. सन २०२३-२४ मध्ये ७ वा वेतन आयोग थकबाकीसाठी रु.५३.४४ कोटी व काल्पनिक वेतनवाढ रु.५.०० कोटी असे मिळून एकत्रित रु. ७३७.८५ कोटीचा सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज केलेला आहे. सन २०२३-२४ साठी उपलब्ध करुन देण्यात यावे.

५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२४-२५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु.७७९.९२ कोटी (नियमित निवृत्ती वेतन व इतर लाभ रु.४७८.०० कोटी व ७ वा वेतन आयोग ३ हप्ते रक्कम रु. ८०.१६ कोटी, मागील थकबाकी रु. १७२.११ कोटी व रु ४४.६५ कोटी असे एकुण रु. २१६.७६ कोटी व काल्पिनिक वेतन वाढ फरकाची रक्कम रु. ५.०० कोटी) अंदाजपत्रकीय अंदाज केलेला आहे. शासनास सदर अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येईल.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

| वित्तीय वर्ष २०२३-२४ चे मुळ, सुधारित व वित्तीय वर्ष २०२४-२५अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय अंदाज/गोषवारा (विवरणपत्र १,२,३ व ४) (रु.लक्ष) | | | |
|---|---|---|---|
| तपशील | मुळ अंदाज वित्तीय वर्ष २०२३-२०२४ | सुधारित अंदाज वित्तीय वर्ष २०२३-२४ | अर्थसंकल्पीय अंदाज वित्तीय वर्ष २०२४-२०२५ |
| १ | २ | ३ | ४ |
| महसुली जमा | १६६११० | १५१८७१ | १६८२५१ |
| महसुली खर्च | १३८२५० | १३२६०१ | १४९९११ |
| भांडवली जमा | २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | २६७९८.१८ | ३८७८८.५५ | ४३७१५.४० |
| एकुण जमा | १९२९०८.१८ | १९०६५९.५५ | २११९६६.४० |
| एकुण खर्च | १६५०४८.१८ | १७१३८९.५५ | १९३६२६.४० |
| आधिक्य / तूट | २७८६०.०० | १९२७०.०० | १८३४०.०० |

**सन २०२४-२५ अर्थसंकल्पीय अंदाजात महसुली जमा आधिक्य दिसण्याची कारणे -**

टिप:- १) सन २०२४-२५ अर्थसंकल्पीय अंदाजात सन २०१७-१८ मध्ये मजीप्राने केलेल्या वेतन भत्त्याची प्रतीपूर्तीची रक्कम रु. १२२५७ लक्ष तसेच सन २०२१-२२ मध्ये मजीप्राने केलेल्या वेतन भत्त्याची प्रतीपूर्तीची रक्कम रु.२३७.०४ लक्ष व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये होणाऱ्या ४१२ पदाच्या पद साठी वेतन व भत्ते रक्कम रु.३०८९ लक्ष शासनाकडून येणे अपेक्षीत असल्याने सदर रकमेचा समावेश महसुली जमा अंतर्गत केला आहे.

२) सन २०२४-२५ अर्थसंकल्पीय अंदाजात सन २०१७-१८ ते सन २०२०-२१ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या निवृत्तीवेतन भत्त्याची प्रतीपूर्तीची रक्कम रु.२१६७६ लक्ष तसेच ७ वा वेतन आयोग थकबाकी ३,४,व ५ हप्त्याची रक्कम रु.८०१६ लक्ष शासनाकडून येणे अपेक्षित असल्याने सदर रकमेचा समावेश महसुली जमा अंतर्गत केला आहे.

| विवरणपत्र क्रमांक १ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सन २०२३-२०२४ चे सुधारित व २०२४-२०२५ चे महसूली जमेचे अर्थसंकल्पीय गोषवारा | | | | | |
| (रू. लाखात) | | | | | |
| | महसूली मिळकतीच्या बाबी | प्रत्यक्ष जमा | मुळ अंदाज | सुधारित अंदाजपत्रक | अर्थसंकल्पीय अंदाज |
| | | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२३-२४ | २०२४-२५ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| शासनाकडून वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनासाठी अनुदान. | | | | | |
| अ | म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यासाठी शासनाकडुन अनुदान २२१५A०४१ | २२९३२ | ३५३३२ | ३१४२२ | ३८७३७ |
| ब | म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतनासाठी अनुदान २२१५A०५२ | ६३४५९ | ७३२८५ | ७३७८५ | ७७९९२ |
| | प्रत्यक्ष खर्च अधारित अपेक्षित मागणी | ० | ० | ० | ० |
| | **एकुण (अ+ब)** | **८६३९१** | **१०८६१७** | **१०५२०७** | **११६७२९** |
| | मजीप्राचे उत्पन्न | | | | |
| क | आस्थापना , हत्यारे व सयंत्रे आकार व इतर | | | | |
| १ | ई.टी.पी. | ८६१ | १००० | १७५४ | १९३० |
| २ | तात्पुरत्या गुंतवणुकीवरील व्याज | १४९८ | २२०० | २४३८ | २६८२ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | तांत्रिक सेवा शुल्क | ९०२५ | ९७०० | ९०१४ | ९९१५ |
| ४ | सल्लागार सेवा शुल्क | ५०० | ३००० | १४५१ | १७५० |
| | **एकूण (क)** | **११८८४** | **१५९००** | **१४६६५** | **१६२७७** |
| ड | पाणी विक्री, मिटर भाडे इत्यादी पासून महसुल | | | | |
| १ | पाणी पटटी ( नागरी ) | ३३०६६ | ३२५०० | २३२०० | २५६०० |
| २ | पाणी पटटी (ग्रामीण ) | ४७२० | ५००० | ६८०० | ७४०० |
| ३ | देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान | ० | ० | ० | ० |
| | **एकूण (ड)** | **३७७८६** | **३७५००** | **३००००** | **३३०००** |
| इ | इतर | २७४७ | ४०९३ | १९७१ | २२१५ |
| ई | प्रकल्प कर्जावरील व्याज म.न.पा/ न.पा. यांना दिलेल्या कर्जावरील व्याज (आयुर्विमा कर्ज ,खुल्या बाजारातील कर्ज, हुडको कर्ज ) | २४ | ० | २८ | ३० |
| | **एकूण (क+ड+इ+ई)** | **५२४४१** | **५७४९३** | **४६६६४** | **५१५२२** |
| | **एकूण (अ+ब+क+ड+इ+ई)** | **१३८८३२** | **१६६११०** | **१५१८७१** | **१६८२५१** |

**विवरणपत्र क्रमांक २**

**सन सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ चे महसुली खर्चाचे अंदाज गोषवारा**

**(रू. लाखात )**

| अ.क्र | महसुली खर्चाची बाब | लेखा शिर्ष क्रमांक | २०२२-२०२३ खर्च | ~~प्रत्यक्ष~~-२०२४ मूळ अंदाज | २०२३-२०२४ सुधारित अंदाज | २०२४-२०२५ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (अ) वेतन,भत्ते व निवृत्ती वेतन खर्च (शासन अनुदान) | | | | | | |
| | अ) म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यासाठी शासनाकडुन अनुदान २२१५A०४१ | २.११ | २२९३२ | ३४३०० | ३०३६१ | ३७६७६ |
| | ब) म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतनासाठी अनुदान २२१५A०५२ | १८.१२ | ६०२४७ | ५१६०९ | ५२१०९ | ५६३१६ |
| | **एकूण (अ)** | | **८३१७९** | **८५९०९** | **८२४७०** | **९३९९२** |
| (ब) प्रशासकीय खर्च- मजीप्रा | | | | | | |
| १ | रुपांतरित आस्थापना वेतन | | २६९४ | ८०२६ | ४९३५ | ६२२९ |
| २ | इतर प्रशासकीय खर्च | २.१२ | १७१७ | ३४४० | २००१ | २४८८ |
| | **एकूण (ब)** | | **४४११** | **११४६६** | **६९३६** | **८७१७** |
| (क) | वाहन, इमारत इ देखभाल दुरुस्ती खर्च | | १४७४ | २००० | २२७३ | २३६३ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (ड) | वाहन,फर्निचर,संगणक खरेदी, संगणक प्रणाली विकसित व नवीन इमारत बांधकाम इ. | | ५६६ | ९७५ | ९०२ | ९३४ |
| (इ) पाणी पुरवठा केंद्राचा खर्च | | | | | | |
| | नागरी | २.४१ ते २.४९ | १६३३९ | १८५३२ | २१०१६ | २३१६१ |
| | ग्रामीण | २.४२१ ते २.४२९ | ६४०४ | ८६६८ | ८२३६ | ८८९८ |
| | **एकूण (इ)** | | **२२७४३** | **२७२००** | **२९२५२** | **३२०५९** |
| (ई) | शासनास जमा करण्यासाठी खर्च (ईटीपी व तांत्रिक शुल्क) | | ७३६० | १०७०० | १०७६८ | ११८४५ |
| (फ) | आयु.महा.मंडळ/खुल्या बाजारातील /हुडको/त्रुटी कर्जावरील व्याज/प्रकल्प कर्ज | | ० | ० | ० | ० |
| | **एकूण (ब+ क+ ड +इ+ई+फ )** | | **३६५५४** | **५२३४१** | **५०१३१** | **५५९१८** |
| | **एकूण (अ+ ब+ क+ ड +इ+ई+फ )** | | **११९७३३** | **१३८२५०** | **१३२६०१** | **१४९९११** |

| विवरणपत्र क्रमांक २ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ चे महसुली खर्चाचे अंदाजपत्रकीय तपशील** | | | | | | |
| **(रू. लाखात )** | | | | | | |
| अ.क्र | महसुली खर्चाची बाब | लेखा शिर्ष क्रमांक | २०२२-२०२३ खर्च | प्रत्यक्ष-२४ मूळ तरतूद | २०२३-२०२४ मंजूर तरतूद | २०२४-२०२५ मंजूर तरतूद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (अ) वेतन,भत्ते व निवृत्ती वेतन खर्च (शासन अनुदान) | | | | | | |
| १ | वेतन व भत्ते | २.११ | | | | |
| | **अ)** म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यासाठी शासनाकडुन अनुदान २२१५A०४१ | २.११ | २२९३२ | ३४३०० | ३०३६१ | ३७६७६ |
| | ब) म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतनासाठी अनुदान २२१५A०५२ | १८.१२ | ६०२४७ | ५१६०९ | ५२१०९ | ५६३१६ |
| | एकूण (अ) | | ८३१७९ | ८५९०९ | ८२४७० | ९३९९२ |
| (ब) प्रशासकीय खर्च- मजीप्रा | | | | | | |
| १ | रुपांतरित आस्थापना वेतन | २.४२१ २.४२९ | २६९४ | ८०२६ | ३७४४ | ३८४७ |
| | रुपांतरित आस्थापना वेतन (थकबाकी) | २.४ | ० | ० | ११९१ | २३८२ |
| | एकूण (१) | | २६९४ | ८०२६ | ४९३५ | ६२२९ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रवास खर्च | २.१ | १४५ | १९० | १८३ | २०० |
| ३ | वैद्यकीय खर्च | २.१ | १४२ | २३४ | १०५ | २३८ |
| ४ | गणवेश व वर्दी | २.१ | ७ | १६ | ६ | ११ |
| ५ | प्रशिक्षण खर्च<br>(अ)संगणक प्रशिक्षण<br>(ब) इतर | २.२ | ४ | ६ | ८० | ३ |
| ६ | निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदान | २.१६ व<br>२.१८ | १९७ | २३० | १ | १ |
| ७ | मुद्रण व लेखन सामुग्री | २.२०१ व<br>२.२८ | १४१ | १५० | १२३ | १६८ |
| ८ | जाहिरात व प्रसिध्दी | २.२ | ५६ | २५ | ९६ | ७७ |
| ९ | टपाल / दुरध्वनी खर्च/ इतर खर्च | २.२०३<br>२.२०४ | ४३ | ७३ | ४८ | ५८ |
| १० | पुस्तके व नियतकालिके | २.२ | २ | २ | ७ | ३ |
| ११ | वीज व पाणी खर्च | २.२ | १०५ | १३५ | १०९ | १५९ |
| १२ | भाडेपट्टी व कर | २.२ | २८० | ४०० | ३७३ | ४२६ |
| १३ | लेखापरीक्षण व शुल्क | २.२ | १ | ३ | १३ | ११ |
| १४ | सल्लागार सेवा | २.२ | ० | २४ | ८३ | ९८ |
| १५ | बँक व खर्च | २.२ | ७ | ० | ० | ० |
| १६ | किरकोळ खर्च<br>(कार्यालयीन खर्च झेरॉक्स इ.) | २.२ | ४१९ | ३०० | ६४७ | ८५४ |
| १७ | कायदेविषयक शुल्क | २.२ | २५ | ६२ | ४८ | ८२ |
| १८ | संगणक देखभाल दुरुस्ती | २.२ | ५४ | ९० | ७८ | ९९ |
| १९ | वृक्ष लागवड व संगोपण | | ० | ० | ० | ० |
| २० | कंत्राटी कामगार (म.जी.प्रा.) | २.२ | ८९ | १५०० | ० | ० |
| | **एकूण (ब)** | | **४४११** | **११४६६** | **६९३६** | **८७१७** |
| (क)वाहन, इमारत इ देखभाल दुरुस्ती खर्च | | | | | | |
| १ | वाहन देखभाल दुरुस्ती | २.३ व २.५१ | ५९४ | ७५३ | ६८४ | ८८२ |
| २ | इमारत, हत्यारे, सयंत्र<br>देखभाल दुरुस्ती खर्च<br>(पा.पु.केंद्र देखभाल दुरुस्ती) | २.५२ व<br>२.५४ | ८८० | ११०० | १४४२ | १३३४ |
| ३ | घसारा आकार | १६ | ० | १४७ | १४७ | १४७ |
| | **एकूण (क)** | | **१४७४** | **२०००** | **२२७३** | **२३६३** |
| (ड) वाहन,फर्निचर,संगणक खरेदी,संगणक प्रणाली विकसित व नवीन इमारत बांधकाम इ. | | | | | | |
| १ | नविन वाहन खरेदी | १२.१८ | २६ | २० | ६ | १७ |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स व उपकरणे | १२.१८ | ० | ५ | ५ | ५ |
| २ | Push Through for Road | १,४९,८२,५६७/- |
| ३ | Road Reinstaining RCC Road | १५,९०,०७,९५२/- |
| ४ | Road Reinstaining BT Road | १०,९७,५०,६१५/- |
| ५ | Existing ESR Dismantled | ५३,५९,०००/- |
| ६ | Proposed ESR Cap.१४.००LL & १५M St. Ht. | १,६६,८२,९०५/- |
| ७ | Proposed ESR Cap.९.०० LL&१५M St.H. | १,३०,७५,१८५/- |
| | निविदेची एकुण किंमत (१ ते ७)रुपये:- | ७३,६८,७०,५३०/- |

ii) **मंजूर योजनेत समाविष्ट तथापि,निविदेत समाविष्ट नसलेली कामे:-**

| अ.क्र. | उपांगांचीनांवे | किंमतरुपये |
|---|---|---|
| १ | रस्ता ओलांडणे फी व वितरण व्यवस्थे मधील इतर किरकोळ कामे | ३,४३,७४,९९४/- |
| | **किंमत** रुपये | ३,४३,७४,९९४/- |

सदर योजनेची ई निविदा प्रक्रीया पार पाडण्यात आली असून यामध्ये खालील तीन एजन्सीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मे.जे.आर.भालेराव अँड कंपनी,पुणे.
२.मे.ईगल इंन्फ्रा इंडियाप्रा.लि. उल्हासनगर, ठाणे मुंबई.
३. मे.प्रगती कंन्स्ट्रक्शन, कंत्राटदार ,लातुर

iii) **उघडण्यात आलेल्या निविदांचा देकारांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

निविदेची किंमतरु.७३,६८,७०,५३०/-

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नांव | देकाराची टक्केवारी | बोलीची किंमत | बोलीचा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | मे.ईगल इंन्फ्रा इंडियाप्रा.लि. उल्हासनगर, ठाणे मुंबई. | १४.४००% जादा दराने | ८४,२९,७९,८८६.३२ | L-१ |
| २ | मे.जे.आर.भालेराव अँड कंपनी, पुणे. | १५.३००% जादा दराने | ८४,९६,११,७२१.०९ | L-२ |
| ३ | मे.प्रगती कंन्स्ट्रक्शन, कंत्राटदार लातुर | १६.२००% जादा दराने | ८५,६२,४३,५५५.८६ | L-३ |

या निविदेसाठी मे.ईगल इंन्फ्रा इंडिया प्रा.लि. उल्हासनगर, ठाणे मुंबई यांचा देकार न्युनतम असुन निविदेतील अंदाजित किंमतीवर तो १४.४००% जादा दराचा प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदाराच्या देकाराची किंमत रु.८४,२९,७९,८८६/-इतकी येते. सदर देकाराबाबत संबंधीत ठेकेदारास वाटाघाटीकरिता पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार सदर कंत्राटदाराचा देकार १४.४०% ज्यादा दराचा सादर केला असून

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर देकाराचे त्यांनी वाटाघाटी नंतर ९.९०% ज्यादा दराची निविदा स्वीकृत करण्याबाबतची विनंती ठेकेदाराने केलेली आहे. संबंधीत कंत्राटदाराच्या सुधारित देकाराच्या समर्थनार्थ मुद्द्यांच्या अनुषंगाने अभिप्राय सादर करण्याबाबतच्या सुचना म.जी.प्रा.चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/कॅम्प-सीबीडी-२/दि.१२.४.२०२४ अन्वये प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सन २०२३- २४ ची दरसूची ही माहे जून -२०२३ मध्ये लागू झाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची २०२२-२०२३ ही माहे जुलै -२०२२ मध्ये लागू झाली आहे. त्यामधील काही बाबींकरिता (डांबरी रस्त्यांची दुरुस्ती करणे वगैरे) सार्वजनिक बांधकाम खात्याचे दर सन २०२२ -२०२३ च्या दरसूचीनुसार घेण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सन २०२३-२४ ची दरसूची लागू होऊन जवळपास नऊ महिने झालेले आहेत. Wholsale Price Index मध्ये झालेले Labour व Material मधील दरामध्ये वाढ झालेली आहे. जल जीवन मिशन अंतर्गत मोठया प्रमाणात पाणी पुरवठा योजनांची कामे सुरु असल्यामुळे डी.आय. पाईपची मागणी मोठया प्रमाणात वाढलेली आहे. तसेच डीआय पाईप उत्पादक व पुरवठादारांची संख्या मर्यादीत असल्यामुळे बाजारात पाईपचा तुटवडा असून दरामध्ये वाढ झालेली आहे. तसेच पाण्याचे उंच टाक्या, जलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम, पाईप लाईन टाकण्याचे कामे इत्यादी सुध्दा मोठया प्रमाणात सुरु असल्यामुळे कुशल व अकुशल कामगार पुरेशा प्रमाणात उपलबध होत नसून मागणी वाढल्यामुळे मजूरीचे दरात सुध्दा वाढ झालेली आहे. डीआय पाईप व मजूरीच्या दरामधील चालू दरसूची व बाजारभावामधील तफावत लक्षात घेता कंत्राटदाराने संदर्भ क्रमांक २ अन्वये नमूद केलेले मुददे संयुक्तीक असल्याचे दिसून येत आहे.

यवतमाळ शहरातील पाणी टंचाईच्या संदर्भाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेले जनहित याचिका सुनावणी दरम्यान मा.न्यायालयाने सदरा योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण करून पाणी टंचाई प्रश्न निकाली काढण्याबाबत न्यायालयीन आदेश प्राप्त असल्याने तसेच पुढील सुनावणी दि.२४.०४.२०२४ रोजी ठरविण्यात आलेली असल्याने, संबंधीत एजन्सीने सादर केलेल्या देकाराबाबत निविदा स्विकृती प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीसमोर सादर करणेबाबत मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, अमरावती यांचे स्तरावरुन स्वतंत्रपणे सादर केला होता.

त्यानुसार सदरचा निविदा स्विकृती प्रस्ताव हा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, यांचे अध्यक्षतेखालील मजीप्राचे निविदा समितीची बैठक १६८ दि.१२/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीचे इतिवृत्तानुसार खालीलप्रमाणे सूचना प्राप्त झाल्या आहेत.

१) सदर निविदेकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचे स्तरावर ठेकेदारासोबत केलेल्या वाटाघाटी अंती १४.४०% जादा दराचा देकार हा ९.९०% जादा दराने सादर केलेला आहे. त्यानुसार निविदा देकाराची किंमत रु.८०.९८५ कोटी इतकी येते.

२) कंत्राटदाराचे सुधारीत देकारानुसार योजनेवर होणारा खर्च ९.४६% वाढ अपेक्षित आहे. त्यानुसार रु.८.६१ कोटी इतका वाढीव खर्च अपेक्षीत आहे.

३) योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयामध्ये पुढील प्रमाणे नमूद केले आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ग-१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत मंजूर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीबाबत आवश्यक ते नियोजन संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेमार्फत व नगर परिषदेमार्फत करण्यात यावे, जेणेकरुन सदर प्रकल्पातून होणारी फल निष्पती ही शाश्वत राहील.

ग-२) सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील. योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही निधी शासनाकडून प्राप्त होणार नाही.

ग-३) प्रकल्प शाश्वत होण्याच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालमध्ये नमूद केलेप्रमाणे पाणी पुरवठा कराची आकारणी करणेबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे नगर परिषदेवर बंधनकारक राहील.

ग-४) मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील असे निर्देश प्राप्त आहेत.

४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तांत्रिक देखरेखीखाली पूर्ण करण्याकरिता यवतमाळ नगर परिषद यांनी नगर परिषदेचे सर्वसाधारण सभा क्र.२५९ मधील विषय क्र.२० नुसार ठराव मंजूर केला आहे. सदर ठरावानुसार नगर परिषदेने योजनेच्या होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी प्रदान केली असून, योजनेअंतर्गत वित्तीय आकृतीबंधानुसार नगर परिषद यवतमाळ उपरोक्त कामाच्या योजना स्विकृतीस व अनुज्ञेय वित्तीय आकृतीबंधास मंजूरी प्रदान केली आहे.

५) यवतमाळ शहरातील अपु-या पाणी पुरवठयासंदर्भात मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे क्रिमीनल जनहित याचिका क्र.२/२०१९ प्रलंबीत असून , मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या दि.०३.०४.२०२४ रोजीच्या आदेशात असे नमूद केले आहे की, यवतमाळ शहरातील काही भागाच पाच दिवसांनी व काही भागात दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याने, म.जी.प्रा.ने सर्व प्रक्रीया पूर्ण करुन सदर आदेशानंतर , २ आठवडयात Technical Bid राज्य शासनास सादर करावे. तसेच यवतमाळ शहरातील पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईनची निविदा राज्य शासनाकडून किती कालावधीत अंतिम केले जाईल याबाबची (Commitment) नोंदीवर मांडावी व तत्संबंधात प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना दि.२४.०४.२०२४ पर्यंत शपथपत्र दाखल करण्याचे मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी आदेश दिले आहेत. जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान आदर्श आचार संहिता लागू असल्याचे मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे निदर्शनास आणण्यात आले असता, मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. "सदर प्रकरणी मानवतावादी दृष्टीकोणातून विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मजीप्राला पुढील प्रकरण मार्गी लावण्याच्या दृष्टीने संपूर्ण प्रक्रीया पूर्ण करुन प्रस्ताव राज्य शासनास दोन आठवडयाच्या कालावधीत सादर करण्यात यावे" असे निर्देशीत केले आहे.

६) निविदा प्रस्तावानुसार योजनेवर मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च अपेक्षीत आहे. जादा खर्चाची जबाबदारी ही नगर परिषद यवतमाळ यांची राहील या अटीचे अधीन राहून निविदा प्रस्ताव आचार संहिता कालावधीत मा.संचालक, नगर परिषद संचालनालय मुंबई यांचे मजीप्राचे पत्र क्र.तांशा-१/४१६ दि.१२.४.२०२४ अन्वये सादर केला होता.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

७) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे निविदा समितीची बैठक १६८ मध्ये सदर निविदेबाबत चर्चा करण्यात आली असून वाढीव खर्च भागविण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तांत्रिक देखरेखीखाली पूर्ण करण्याकरिता यवतमाळ नगर परिषद यांनी नगर परिषदेचे सर्वसाधारण सभा क्र.२५९ मधील विषय क्र.२० नुसार ठराव मंजूर केला आहे. सदर ठरावानुसार नगर परिषदेने योजनेच्या होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी प्रदान केली असून, योजनेअंतर्गत वित्तीय आकृतीबंधानुसार नगर परिषद यवतमाळ उपरोक्त कामाच्या योजना स्विकृतीस व अनुज्ञेय वित्तीय आकृतीबंधास मंजूरी प्रदान केली आहे." नगर परिषदेने पत्र क्र.साप्रवि-०६/ दि.१९.४.२०२४ नुसार नगर परिषदेची सध्याची परिस्थिती पाहता जादा दराच्या निविदेमुळे वाढीव रक्कम भरणे शक्य नाही. त्याकरिता शासन मान्य संस्थेकडून कर्ज घेणे आवश्यक आहे. असे असतांना वाढीव अनुदानाची मागणी पूर्ण करणे नगरपरिषदेला शक्य नाही. त्यामुळे वाढीव दराला मान्यता देऊ नये अथवा वाढीव खर्च शासनाकडून मागणी करण्यात यावा. शासनाकडून निधी मिळाल्यास, जादा देकाराची रक्कम देणे शक्य राहील, याबाबत नगर परिषदेकडून पाठपुरावा करणेत येईल असे कळविले आहे.

सदर निविदेसंबंधीच्या चर्चे दरम्यान मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग यांनी सुचविल्यानुसार, सदर योजने नगर परिषदेने हस्तांतर न करुन घेतल्यामुळे सदय:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असल्याने तसेच योजनेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल जनहित याचिकेबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने, सदर वाढीव खर्चाची रक्कम नगर परिषदेकडून प्राप्त होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने सदय:स्थितीत मजीप्राच्या स्व:निधीतून खर्च करण्याच्या अटीवर देण्यात यावी. नगर परिषदेकडून रक्कम प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कमेचे समायोजन करण्यात यावे. वाढीव रक्कम शासनाकडून प्राप्त करुन किंवा कर्ज उभारुन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी नगर परिषद यवतमाळ यांची राहील तसेच मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी सुध्दा वाढीव रक्कमेबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा. याबाबत मा.निविदा समितीचे अध्यक्ष यांनी याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

"तसेच यवतमाळ नगर परिषदेचे पत्र क्र.यनप/कावि/साप्रवि/ १६१२ दि.०९.६.२०२४ अन्वये वाढीव रकमेचा भरणा नगर परिषद निधीच्या उपलब्धतेनुसार अथवा वैशिष्टपूर्ण (ठोक तरतुद) अथवा खनिज विकास निधी मधून यवतमाळ नगर परिषद भरण्यास तयार आहे, असे कळविले आहे."

वरीलप्रमाणे प्रस्तावात नमूद केल्यानुसार सदर वाढीव खर्चाची रक्कम नगर परिषदेकडून प्राप्त होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने सदय:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्व:निधीतून खर्च करण्यास मान्यता देणे विषयीचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सादर करण्यात आला आहे.

यवतमाळ शहरातील अपु-या पाणी पुरवठयासंदर्भात मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे क्रिमीनल जनहित याचिका क्र.२/२०१९ प्रलंबीत असून यवतमाळ नगर परिषदेचे पत्र क्र.यनप/कावि/साप्रवि/ १६१२ दि.०९.६.२०२४ अन्वये वाढीव रकमेचा भरणा नगर परिषद निधीच्या उपलब्धतेनुसार अथवा वैशिष्टपूर्ण (ठोक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

तरतुद) अथवा खनिज विकास निधी मधून यवतमाळ नगर परिषद भरण्यास तयार आहे, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना ता.जि. यवतमाळ या योजनेचे कार्यादेश देणे आवश्यक असून नगरोत्थान महाभियानांतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या दि.१८/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत निर्णय दिल्याप्रमाणे, सदर प्रकल्पाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार स्व:हिशाचा निधी यवतमाळ नगर परिषदेने उभारावा व वाढीव खर्चाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्व:निधीमधून उपलब्ध करुन दयावी व त्यानंतर यवतमाळ नगर परिषदेने निधीच्या उपलब्धतेनुसार सदर निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन दयावा व याबाबत पाठपुरावा मुख्य अभियंता, म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी यवतमाळ नगर परिषदेकडे करावा अशी समितीने शिफारस केली आहे

वरीलप्रमाणे सदर कामासाठीचा वाढीव खर्च रु.८६१.१५ लक्ष इतका खर्चाची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्व:निधीतून करण्यास मान्यता देण्याविषयीच्या प्रस्तावावर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीची बैठक क्र.१६८ दि.१२.०६.२०२४ मधील निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना ता.जि. यवतमाळ या योजनेकरिता प्राप्त निविदा स्विकृती ९.९०% जादा दराने असून अपेक्षीत वाढीव खर्चाचे रकमेचा भरणा नगर परिषद यवतमाळ यांच्याकडून निधी उपलब्ध होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून खर्च करण्याच्या अटीवर निविदा स्विकृती प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे, तसेच नगरोत्थान महाभियानांतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या दि.१८/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत निर्णय दिल्याप्रमाणे, सदर प्रकल्पाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार स्व:हिशाचा निधी यवतमाळ नगर परिषदेने उभारावा व वाढीव खर्चाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपलब्ध करुन दयावी व त्यानंतर यवतमाळ नगर परिषदेने निधीच्या उपलब्धतेनुसार सदर निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन दयावा अशी शिफारस केली आहे. त्यानुसार सदर योजनेच्या वाढीव खर्चाकरिता अपेक्षीत वाढीव निधी रु.८६१.१५ लक्ष इतका खर्चाची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्व:निधीतून करण्यास मान्यता देण्याविषयीच्या प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अमृत-२ तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान इ. कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यतेकरीता प्राप्त होणाऱ्या पाणी पुरवठा तसेच मलनि:सारण प्रकल्पास तांत्रिक मान्यता देताना म.जी.प्रा.मार्फत आकारण्यात येणारे तांत्रिक तपासणी शुल्क टप्प्याटप्प्याने सुलभ हप्त्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून भरणा करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :** १. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.नगरो-२०२३/प्र.क्र.३८९/नवि-३३, दि.२२.०२.२०२४.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२. नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३, दि.१६.०९.२०२२.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परिपत्रक्र क्र.१५७, दि.०२.०८.२०१४.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अमृत-२ तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान इ. कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यतेकरीता पाणी पुरवठा तसेच मलनिःसारण प्रकल्प प्राप्त होतात. सदर प्रकल्पास तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी संदर्भिय शासन निर्णय तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परिपत्रकानुसार १% इतके तांत्रिक तपासणी शुल्क आकारण्यात येऊन ते नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा केल्यानंतरच प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता देण्यात येते.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्रकल्पास तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक तपासणी शुल्काची मागणी केली असता त्यांच्याकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे महसूल उत्पन्न अतिशय कमी असणे, आर्थिक स्थिती नसणे अशी कारणे नमूद करून एकरकमी तांत्रिक शुल्काची रक्कम भरणा करून न घेता तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी काही अंशी रक्कम भरणा करून घेऊन उर्वरित रक्कम टप्याटप्याने सुलभ हप्त्यात भरणा करून घेऊन तांत्रिक मान्यता देण्याकरिता विनंती करण्यात येत आहे. त्यामुळे तांत्रिक तपासणी शुल्काची उर्वरित रक्कम टप्याटप्याने सुलभ हप्त्यात भरणा करून घेण्यास मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव म.जी.प्रा. मध्यवर्ती कार्यालयाकडे प्राप्त होत असून याबाबत सद्य:स्थितीत कार्यवाही करण्यात येत आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी तांत्रिक तपासणी शुल्काची संपूर्ण रक्कम तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी न भरल्याने तांत्रिक मान्यता देण्यास विलंब होतो. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून योजनेच्या पुढील कार्यवाहीस जसे प्रशासकीय मान्यता, निविदा कार्यवाही इत्यादीस होणारा विलंब नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रमाणे चर्चा होऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता देताना आकारण्यात येणारे तांत्रिक तपासणी शुल्क सुलभ हप्त्यात टप्याटप्याने भरणा करून घेण्यास खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अमृत-२ तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान इ. कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यतेकरीता प्राप्त होणाऱ्या पाणी पुरवठा तसेच मलनिःसारण प्रकल्पांकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून १% इतके तांत्रिक तपासणी शुल्क आकारण्यात येते. सदर तांत्रिक तपासणी शुल्क तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे महसूल उत्पन्न अतिशय कमी असणे, आर्थिक स्थिती नसणे अशी कारणे नमूद करून एकरक्कमी तांत्रिक शुल्काची रक्कम भरणा करून न घेता तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी काही अंशी रक्कम भरणा करून घेऊन उर्वरित रक्कम टप्याटप्याने सुलभ हप्त्यात भरणा करून घेऊन तांत्रिक मान्यता देण्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विनंती करण्यात येत आहे. या अनुषंगाने तांत्रिक शुल्काची उर्वरित रक्कम टप्याटप्याने सुलभ हप्त्यात भरणा करुन घेणेबाबत

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येत असून मजीप्राकडून करण्यात आलेल्या सदर कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी तांत्रिक तपासणी शुल्काची संपूर्ण रक्कम तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी न भरल्याने तांत्रिक मान्यता देण्यास विलंब होतो. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून योजनेच्या पुढील कार्यवाहीस जसे प्रशासकीय मान्यता, निविदा कार्यवाही इत्यादीस होणारा विलंब नाकारता येत नाही. सदर बाब विचारात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या पाणी पुरवठा तसेच मलनि:सारण प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता देताना मजीप्राकडून आकारण्यात येणारे तांत्रिक तपासणी शुल्क सुलभ हप्त्यात टप्याटप्याने भरणा करून घेण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रकल्प अहवालाच्या एकूण तांत्रिक तपासणी शुल्कापैकी तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी व तांत्रिक मान्यता दिल्यानंतर टप्याटप्याने किती तांत्रिक तपासणी शुल्क संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून भरणा करून घ्यावे याबाबतचा निर्णय घेण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.
२. तांत्रिक मान्यता दिल्यानंतर उर्वरित तांत्रिक तपासणी शुल्क एका वर्षात सुलभ हप्त्यात अथवा त्याआधी योजनेस शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर एकाच हप्त्यात यापैकी जे अगोदर होईल त्याप्रमाणे प्राप्त करून घेण्यात यावे.
३. तांत्रिक तपासणी शुल्क संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांची राहील.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत, उल्हासनदी उद्भवावर आधारित अंबरनाथ व बदलापूर शहराच्या तांत्रिक मान्यता प्राप्त योजनेत प्रस्तावित काही उपांगांचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.

अंबरनाथ व बदलापूर शहरा करीता सद्यस्थितीत उल्हास नदीवरून १४० द.ल.ली. प्रती दिन पाणी आरक्षण उपलब्ध असून, पंपींग मशिनरी २४ तास चालवूनही १२२ द.ल.ली. ते १२५ द.ल.ली. प्रती दिन म्हणजे सरासरी १२३ द.ल.ली. पाण्याची उचल करण्यात येते. त्यामुळे पाणी मागणी व प्रत्यक्ष होणारा पाणी पुरवठा यातील तफावत कमी करण्याच्या दृष्टीने तातडीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २०.०० द.ल.ली. पाणी देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. तांशा-१/ ४१९९ दि.२८/०९/२०२१ अन्वये मागणी करण्यात आलेली आहे. सदर मागणी प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून अद्याप पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे बदलापूर येथील बॅरेज येथील जॅकवेलमधून अतिरिक्त १५.०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उचल करून अंबरनाथ व बदलापूर शहराला पाणी पुरवठा करणे करीता १५.०० द.ल.ली. क्षमतेचे पॅकेज जलशुध्दीकरण केंद्र व इतर अनुषंगीक कामे यांचा समावेश करून स्वतंत्र योजना तयार करून सादर करण्यात

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

आलेली होती. त्याची अंदाजपत्रकीय किंमत रु.४१२.८१ लक्ष (निव्वळ) व रु. ४८७.११ लक्ष (ढोबळ) इतकी होती.

दिनांक १२/१०/२०२२ रोजी मा.मंत्री महोदय (पाणी पुरवठा व स्वच्छता), मंत्रालय, मुंबई यांचे दालनात झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सदर उपाययोजना करणेच्या खर्चास म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून मंजूरी देण्याबाबतचे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिलेले होते. करीता सदर प्रस्तावास अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. तांशा-३/ २१२१ दि. १०/१०/२०२२ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान करण्यात आलेली असून, दि.१८/१०/२०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५३ व्या बैठकीमध्ये आयत्यावेळेचा कार्यक्रम बाब क्र. १ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर काम पूर्ण झाले असून, १५ द.ल.ली. प्रति दिन पाणी अंबरनाथ व बदलापूर शहराकरीता उपलब्ध झाले आहे.

दिनांक २२/११/२०२२ रोजी मा.मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई यांचे दालनात बदलापूर पाणी पुरवठा योजना आढावा बैठकीत मा.आमदार श्री. किसनजी कथोरे यांनी योजनेत प्रस्तावित जलकुंभापैकी अत्यावश्यक असलेले जलकुंभ तातडीने बांधणे बाबत मा.मंत्री महोदयांकडे मागणी केलेली होती. त्यानुषंगाने सदस्य सचिव यांनी तातडीने सदर प्रस्ताव तयार करणे बाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. तांशा-२/ ७६१८ दि.०५/१२/२०२२ अन्वये तांत्रीक मान्यता प्राप्त योजनेतील अत्यावश्यक उपांगांचा समावेश करून रु.२८,०९,०१,७७८/- मात्र ढोबळ किंमतीची योजना सादर करण्यात आली होती. सदर योजनेमध्ये खालील उपांगांचा समावेश करण्यात आला होता.

**(Amount in Rupees)**

| No | Description of Item | Amount |
|---|---|---|
| 1 | Gravity Main, Shanti Nagar to Saroday Nagar Dia-350mm, Di k-7, L-2300m<br>Shanti Nagar to Amrai Dia-350mm. Di k-7, L.-1500m | 2,32,22,350.00 |
| 2 | Sump at Saroday Nagar | 31,86,550.00 |
| 3 | Pump House at Saroday Nagar | 11,93,300.00 |
| 4 | Rising Mains<br>Ambedkar Kaman to Kirti Police Dia-500mm. Di k-9, L-1420m<br>Kirti Police to Carmel school Dia-350mm. Di k-9, L-2000m<br>Junction to Kirti Police Dia-400min, Di k-9. L-20m | 2,93,46,400.00 |
| 5 | ESRs at Various locations | 11,26,28,250.00 |
| 6 | PURE WATER PUMPING MACHINERY AT SARVODAY NAGAR AND Kharvan | 3.64,20.069.75 |
| 7 | Road Restoration | 1,82,36,420.80 |
| 8 | Rising Main from Ambernath booster pumping station to Fulenagar ESR, Dia-250mm. Dik-9, L-1500m | 77,53,715.30 |
| | **NEW AMOUNT** | **23,19,87,055.85** |
| | 3 % Contingencies | 69,59,611.68 |
| | 18% GST | 4,17,57,670.05 |
| | **GROSS AMOUNT** | **28,07,04,337.58** |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर योजनेस म.जी.प्रा. मा.संचालक मंडळाच्या दि.२५/०४/२०२३ रोजी पार पडलेल्या १५४ व्या बैठकीत बाब क्र.८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार योजनेत समाविष्ठ कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या असून, स्विकृत निविदे पोटी अपेक्षित खर्चाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

**(रक्कम रुपये)**

| | | |
|---|---|---|
| १ | अंबरनाथ व बदलापूर शहरात ८ ठिकाणी उंच जलकुंभ बांधणे व जलवाहीनी टाकणे (स्विकृत निविदा क्र. बी-१/ ४०४ सन २०२३-२४) | १६,८६,६३,६४४/- |
| २ | पाईप्सचा पुरवठा करणे | ३,९३,८७,२५३/- |
| ३ | अंबरनाथ व बदलापूर येथे विविध ठिकाणी पंपींग मशिनरी बदलणे (स्विकृत निविदा क्र. बी-१/ ३६६ सन २०२३-२४) | ३,४५,९९,०३३/- |
| ४ | अंबरनाथ बुस्टर ते फुलेनगर जलकुंभापर्यंत २५० मि.मी. व्यासाची उर्ध्ववाहीनी टाकणे | ७७,५३,७१५/- |
| ५ | पर्यवेक्षण खर्च | ६९,०४,९७४/- |
| ६ | योजनेवरील एकूण निव्वळ खर्च | २५,७३,०८,६१९/- |
| ७ | योजनेवरील एकूण जी.एस.टी खर्च | ३,८१,६७,६८१/- |
| ८ | योजनेवरील एकूण ढोबळ खर्च | २९,५४,७६,३००/- |
| ९ | मंजूर किंमतीपेक्षा होणारी संभाव्य वाढ | १,४७,७१,९६३/- |

योजनेच्या मंजूर किंमतीपेक्षा अपेक्षीत किंमतीमध्ये रु.१.४७ कोटी इतकी वाढ होत असल्याने वाढीव खर्चास मा.संचालक मंडळ, म.जी.प्रा. यांची मान्यता घेणे आवश्यक असून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत अभियान टप्पा-२ अंतर्गत प्रस्तावित कामापैकी तातडीने अंबरनाथ शहरातील सर्वोदय नगर येथील उंच जलकुंभ व बदलापूर शहरातील कारमेल स्कुल उंच जलकुंभ, किर्ती पोलीस, उंच जलकुंभ, कोनार्क गार्डन उंच जलकुंभ व आमराई उंच जलकुंभ बांधणे व अनुषंगीक कामे करणेच्या प्राप्त निविदे नुसार योजनेवर रु.२६.५४ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता योजनेवर रु.१.४७ कोटी इतकी वाढ होत असून, प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** नगरोत्थान महाभियान अंतर्गत वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा योजना (चिखलोली धरण उद्भव) अंतर्गत
चिखलोली धरणाची उंची वाढविणेचे काम पाटबंधारे खात्याकडून करण्यात येत असल्याने पाटबंधारे खात्याकडे निधी वर्ग करण्यासाठी म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून रक्कम उपलब्ध होणेबाबत.

अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेची थोडक्यात माहिती :-

अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे असून, या केंद्रातून अंबरनाथ व बदलापूर शहरासह आयुध निर्माण कारखान्यास पाणी पुरवठा केला जातो. बदलापूर येथे उल्हास नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेजहेड वर्क्स येथे दररोज सुमारे १२० द.ल.ली. पाणी उचलून ते शुध्द करून अंबरनाथ व बदलापूर शहरास पुरविले जाते. अंबरनाथ शहराच्या पूर्वेकडील नवरेनगर, श्रीकृष्णनगर, लक्ष्मीनगर, वडवली, शिवाजीनगर, आंबेडकरनगर इ. भागासाठी चिखलोली जलशुध्दीकरण केंद्रातून ६ द.ल.ली. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १६ द.ल.ली. असे २२ द.ल.ली. प्रतिदिन इतके पाणी घेवून तेही पुरवण्यात येत आहे.

या भागासाठी वाढती लोकसंख्या विचारात घेऊन सन २०४८ च्या प्रकल्पित लोकसंख्येच्या पाण्याच्या मागणीसाठी एक योजना तयार करून शासनास सादर करण्यात आली होती. या वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेस महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाभियान अंतर्गत वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेस महाराष्ट्र शासन निर्णय क्र. नगरो.-२०१८/प्र.क्र.५००/ नभव-३३/ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.३१/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेची किंमत रु. ३११० लक्ष असून, यामध्ये महाराष्ट्र शासनाचे अनुदान (७५%) रु. २३३२.५० लक्ष व म.जी.प्रा.चा हिस्सा (२५%) रु. ७७७.५० लक्ष आहे. सदर योजनेमध्ये खालील उपांगांचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | चिखलोली धरणाची उंची वाढविणे<br>(हे काम पाटबंधारे खात्यामार्फत करण्यात येत आहे) |
| २ | ५०० मि.मी. व्यासाची गुरुत्ववाहीनी टाकणे |
| ३ | ७.२० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचे जल शुध्दीकरण केंद्र |
| ४ | नवरेनगर पर्यंत उध्दरण नलिका टाकणे |
| ५ | उंच टाकी बांधणे (क्षमता २.०० द.ल.ली.) |
| ६ | जल शुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्द पाण्याची पंपींग मशिनरी बसविणे |
| ७ | विविध ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे |

प्रस्तावित कामांची आवश्यकता :-

सद्यस्थितीत चिखलोली धरणातून केवळ ६ द.ल.ली. प्रतिदिन पाणी उचलण्यात येवून ते अंबरनाथ पूर्व भागात पुरविण्यात येते. तथापी वाढत्या लोकसंख्येस हे पाणी अपूरे पडत असल्याने महा.औ.वि.महामंडळाकडून

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पाणी घेण्यात येते. चिखलोली धरणाची उंची वाढविल्यास या धरणातून दररोज १२ द.ल.ली. प्रतिदिन इतके पाणी उचलता येईल व तेवढे पाणी एम.आय.डी.सी. कडून घेण्यात येणाऱ्या पाण्यातून कमी करण्यात येईल. त्यामुळे चिखलोली धरणाची उंची वाढविण्याच्या कामाच्या योजनेमध्ये समाविष्ट असलेले चिखलोली धरणाची उंची वाढविणे हे काम पाटबंधारे विभागामार्फत करण्यात येत असून, हे काम ७०% इतके पूर्ण झाले आहे. सदर कामाची किंमत रु.२१,११,४१,०७७/- इतकी असून, हि सर्व रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाटबंधारे खात्यास वर्ग करावयाची आहे.

सदर योजनेच्या कामाकरिता दिनांक २१/०९/२०१९ रोजी रु.२.३८,८९,०००/- व दिनांक ०१/०६/२०२० रोजी रु.५,३०,३४,०००/- असे एकूण रु.७,६९,२३,०००/- या कार्यालयास प्राप्त झाले होते. दिनांक ०३/१२/२०१३ रोजी रु. २.० कोटी इतकी रक्कम पाटबंधारे खात्याकडे याआधीच वर्ग करण्यात आली आहे. तसेच सदर कामासाठी रु. ३.० कोटी कार्यकारी अभियंता, ठाणे पाटबंधारे विभाग कळवा यांना दिनांक ०२/०१/२०२१ रोजी आणि दिनांक १७/०९/२०२१ रोजी रु. २.० कोटी इतकी रक्कम पाटबंधारे खात्याकडे वर्ग करण्यात आली आहे. अशा प्रकारे आत्तापर्यंत रु. ७.० कोटी इतकी रक्कम त्यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. सद्यस्थितीत एकूण कामाच्या ७०% एवढे काम पूर्ण झाले आहे. माहे डिसेंबर-२०२१ अखेर प्रत्यक्ष काम व स्वामित्व शुल्कापोटी रु.७.० कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. धरणाच्या उंची वाढीचे काम मे-२०२२ अखेर पूर्ण करण्यासाठी पाटबंधारे खात्याने रु. १३.०० कोटींची मागणी केली आहे.

या योजनेच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाने वितरीत केलेल्या पहिल्या हप्त्याच्या अनुदानाची रक्कम व त्या प्रमाणात नागरी स्वराज्य संस्थेने जमा केलेली पहिल्या हप्त्याची स्वहिश्याची रक्कम अशा एकत्रित रकमेच्या ७० टक्के खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र नगरपरिषद प्रशासन संचालनालय मार्फत शासनास सादर केल्यानंतरच राज्य शासनाचा दुसरा हप्ता वितरीत केला जाईल असे निर्देश आहेत. त्यामुळे म.जी.प्रा.च्या स्वनिधीचे (पहिला हप्ता रु. १.९२ कोटी + दुसरा हप्ता ४.५० कोटी) असे एकूण ६.४२ कोटी या कार्यालयाकडे वर्ग होणे आवश्यक आहे.

अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्राची आर्थिक स्थिती :-

सद्यस्थितीत अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्र नफ्यात असून, मागील दहा वर्षाची आकारणी, वसुली व खर्च दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | आकारणी | वसुली | खर्च | नफा / तोटा |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | २६२८.७७ | २३२२.३७ | १५७३.०१ | ७४९.३६ |
| २०१२-१३ | २९९२.१५ | २६८३.४९ | १६५४.७१ | १०२८.७८ |
| २०१३-१४ | ३२९५.५० | २९७३.४६ | १८४७.१५ | ११२६.३१ |
| २०१४-१५ | ३४००.८५ | ३२०२.१८ | २०४४.४७ | ११५७.७१ |
| २०१५-१६ | ३५५९.९९ | ३२८६.६३ | २३२८.५५ | ९५८.०८ |
| २०१६-१७ | ३६१९.१० | ३१४२.४० | २२७१.८० | ८७०.६० |
| २०१७-१८ | ३७३१.१३ | ३२४१.४९ | २५८४.४७ | ६५७.०२ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ३७९६.०७ | ३२५०.७९ | २४२८.४२ | ८२२.३७ |
| २०१९-२० | ४३०१.१७ | ३४५५.२४ | २७५२.०७ | ७०३.१७ |
| २०२०-२१ | ४४५५.९४ | ३५१२.९० | ३३५३.७४ | १५९.१६ |
| **एकूण** | **३५७८०.६७** | **३१०७०.९५** | **२२८३८.३९** | **८२३२.५६** |

वरील तक्त्यानुसार सदर योजनेमध्ये नफा होत असल्याचे आढळून येत आहे.

उक्त नमुद केल्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्त्रोतातुन आवश्यक रक्कम उभारणी करण्याबाबत मा. संचालक वित्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी निर्देश दिले होते.

अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अबरनाथ व बदलापूर शहरामध्ये सन २०१८ पासून जानेवारी-२०२२ पर्यंत अनधिकृत नळजोडणीच्या पाणी वापरापोटी दंडणीय रक्कम रु.५.५९ कोटी व भांडवली अंशदानापोटी रु.२०.२७ कोटी असे एकूण रु.२५.८६ कोटी अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रामार्फत म.जी.प्रा.स प्राप्त झाले आहे. नियमित पाणी विक्रीपोटी दरवर्षी प्राप्त होणाऱ्या रक्कमे व्यतिरिक्त ही रक्कम असून, आजपर्यंत अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेच्या उत्पन्नामध्ये दर्शविण्यात आलेली नाही.

या योजनेसाठी शासनाकडून दुसरा हफ्ता प्राप्त होण्या करिता किमान रू.६.४२ कोटी इतका निधी पाटबंधारे खात्याकडे तातडीने वर्ग करणे आवश्यक आहे. त्या करिता या विभागातर्फे ५% घटणाऱ्या व्याजदरानुसार (Diminishing Rate of Interest). पुढील पाच वर्षासाठी कर्ज परतफेड वेळापत्रक (Repayment Schedule) खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

परतफेड वेळापत्रक (Repayment Schedule)

| योजनेचे नाव | योजनेची मंजूर किंमत | महाराष्ट्र शासन अनूदान | स्वनिधी (म.जि.प्रा.) | प्रस्तावित कर्ज हिस्सा | | | कर्ज परतफेड कालावधी (वर्षे) | कर्ज परतफेडीसह योजना नफ्यात राहिल का ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ रक्कम | ५% व्याज | एकूण | | |
| वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा | रू. ३११०/- लक्ष | रू.२३३२.५० लक्ष (७५%)<br><br>प्राप्त रक्कम रू. ७.६९ लक्ष (पहिला हफ्ता) | रू.७७७.५० लक्ष (२५%)<br><br>पहिला हफ्ता रू १९२.०० लक्ष दुसरा हफ्ता रू. ४५०.०० लक्ष एकुण रू. ६४२.०० लक्ष प्राप्त रक्कम निरंक | रू.१२८.४० लक्ष | रू.३२.१० लक्ष | रू.१६०.५० लक्ष | २०२२-२३ | होय. |
| | | | | रू.१२८.४० लक्ष | रू.२५.६८ लक्ष | रू.१५४.०८ लक्ष | २०२३-२४ | होय. |
| | | | | रू.१२८.४० लक्ष | रू.१९.४६ लक्ष | रू.१४७.८६ लक्ष | २०२४-२५ | होय. |
| | | | | रू.१२८.४० लक्ष | रू.१२.८४ लक्ष | रू.१४१.२४ लक्ष | २०२५-२६ | होय. |
| | | | | रू.१२८.४० लक्ष | रू.६.४२ लक्ष | रू.१३४.८२ लक्ष | २०२६-२७ | होय. |
| | | एकुण | | ६४२.०० | ९६.५० | ७३८.५० | | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**टीप :-** असे सादर करण्यात येते की राज्य शासनाचा पहिला हफ्ता रू.७.६९ कोटी या कार्यालयात प्राप्त असून, त्यातील ७.०० कोटी रू. पाटबंधारे विभागास सदर योजनेच्या कामासाठी वर्ग करण्यात आले आहेत. परंतू अद्याप म.जी.प्रा. चे स्वनिधीचे रू.७७७.५० लक्ष (२५%) अप्राप्त आहेत. सदर योजने अंतर्गत धरणाच्या उंची वाढीचे काम मे-२०२२ अखेर पुर्ण करण्यासाठी पाटबंधारे खात्याने रू. १३.०० कोटींची मागणी केली आहे. त्यामूळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे स्वनिधीचे पहले दोन हफ्ते रू. १.९२ कोटी + ४.५० कोटी असे एकूण ६.४२ कोटी या कार्यालयाकडे वर्ग करावे.

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अंबरनाथ पाणीपुरवठा केंद्र नफ्यात असून म.जी.प्रा मार्फत स्वनिधीतून या योजने करता कर्जाची रक्कम प्राप्त होणे आवश्यक आहे. ती रक्कम वितरीत झाल्यानंतर या योजनेची अर्थिक प्रगती कायम राखता येईल. त्यामुळे योजनेच्या प्रगतीप्रथावरील कामा करिता रू.६.४२ कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्त्रोतातून कर्ज म्हणुन उपलब्ध करून द्यावा जेणेकरून शासकीय अनुदानाचा दुसरा हफ्ता वितरीत होणेबाबत पाठपुरावा करणे शक्य होईल.

**ठराव :-**

नगरोत्थान महाभियान अंतर्गत वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा याजना (चिखलोली धरण उद्भव) अंतर्गत चिखलोली धरणाची उंची वाढविणेचे काम पाटबंधारे खात्याकडून करण्यात येत असल्याने पाटबंधारे खात्याकडे निधी वर्ग करण्यासाठी म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून रक्कम रु.६.४२ कोटी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यानुसार या प्रस्तावाची कार्यक्रम बाब तयार करण्यात आली असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून रु.६.४२ कोटी मिळणेसाठी या कार्यक्रम बाबीस मान्यता देण्याकरीता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.